महात्मा गांधी तंटामुक्त समितीची ग्रामविकासातील भुमिका व योगदान: एक समाजशास्त्रीय अध्ययन (विशेष संदर्भ : लातूर जिल्हा)

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या सामाजिक शास्त्रे विद्याशाखेअंतर्गत पीएच्.डी. (समाजशास्त्र) पदवीसाठी सादर करावयाचा संशोधन आराखडा

संशोधक

प्रा. ज्योती ज्ञानोबा मुंडे

समाजशास्त्र विभाग,

मास्टर दीनानाथ मंगेशकर महाविद्यालय,

औराद (शहा.), ता. निलंगा, जि. लातूर

मार्गदर्शक

प्रा. डॉ. अंजली जोशी (टेंभुर्णीकर)

समाजशास्त्र विभाग,

दयानंद महाविद्यालय, लातूर

मार्च २०१८

महात्मा गांधी तंटामुक्त समितीची ग्रामविकासातील भुमिका व योगदान: एक समाजशास्त्रीय अध्ययन (विशेष संदर्भ : लातूर जिल्हा)

१. प्रस्तावना :-

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर महात्मा गांधी यांनी सर्वप्रथम भारतीय खेड्याच्या विकासाची भुमिका मांडली. यासाठी त्यांनी 'खेड्याकडे चला' असा नारा दिला. कारण तत्कालीन परिस्थितीत शहराच्या तुलनेत ग्रामीण भागामध्ये वास्तव्य करणा-या लोकसंख्येचे प्रमाण जास्त होते, ते आजही कमी अधिक प्रमाणात आहे. भारतातील खेडे सुधारले तरच देश सुधारेल. परिणामी देशाचा विकास होईल हे विकासाचे मुळ सुत्र गांधीजींनी हेरले होते. त्यानुसारच प्रत्येक पंचवार्षिक योजनेत शासनाने गाव विकासाला प्राधान्य देण्याचा वेळोवेळी प्रयत्न केलेला आहे.

प्राचीन काळातील गावाचा विचार केला तर ते स्वयंपूर्ण होते. लोकांच्या गरजा गावातच भागविल्या जात होत्या. पैसा या विनिमय साधनाऐवजी वस्तु विनिमय पद्धती अस्तित्वात होती. म्हणजेच वस्तुच्या बदल्यात वस्तू किंवा सेवा दिली जात होती. गावामध्ये बारा बलुतेदार व अठरा अलुतेदार कार्यरत होते. गावामध्ये एकोपा व सामंजस्याची भावना होती. गावातील प्रत्येक व्यक्ती एकमेकाच्या सुख-दुःखात, अडी-अडचणीत धावून येत होता. प्रसंगी वाद विवाद जरी झाले तरी ते गावपातळीवर ज्येष्ठांच्या मार्गदर्शनाखाली सामंजस्याने सोडविले जात आणि पुन्हा गावातील सर्व व्यक्ती एकत्रपणे गुण्या-गोविंदाने राहत. अलिकडच्या काळात औद्योगिकरण व शहरीकरणाला जसजशी चालना मिळत गेली तसतसे गावातील एकोपा, सामंजस्य वृत्ती आणि आपुलकी लोप पावत चालली आहे. स्वयंपूर्ण असलेले गाव आज पुर्णपणे परावलंबी बनून ते शहरावर अवलंबून आहे.

एकेकाळी समस्यामुक्त असलेले गाव आज अनेक समस्यांनी ग्रासलेले आहे. या विविध प्रकारच्या समस्या कमी करण्याचा कधी गावपातळीवरून तर कधी शासकीय पातळीवरून प्रयत्न होताना दिसुन येत आहे. आज ग्रामीण भागात क्षुल्लक कारणासाठी वाद विवाद होताना दिसून येत आहेत. या वाद विवादाची प्रकरणे पुर्वी गावपातळीवर

जात पंचायतीच्या माध्यमाद्वारे मिटवली जात होती. मात्र स्वातंत्र्यप्राप्तीनंतर कायद्याचे राज्य आल्यामुळे वाद विवादाचा निपटारा कायदेशीर मार्गाने केला जात आहे. परिणामी गावातील व्यक्ती वाद विवाद झाल्यानंतर तो मिटविण्यासाठी पोलीस स्टेशन व न्यायालयात दाद मागत आहेत. न्यायालयात दाद मागणे हे कायद्याच्या राज्यात गैर नाही मात्र न्यायालयाची आजची परिस्थिती विचित्र स्वरुपाची बनली आहे. दिवसेंदिवस गाव पातळीवरील वाद विवादाचे प्रमाण प्रचंड वाढत आहे आणि त्याचा निवाडा करण्याचे कार्य न्याय व्यवस्थेलाही अशक्य झाले आहे. बहुतांश वेळा तर न्याय मागणा-या व्यक्तीला त्याच्या मृत्युनंतर न्याय मिळाल्याची अनेक उदाहरणे आहेत. त्या वादाची किंवा समस्येची तिव्रता संपल्यानंतर न्यायालयाचा निकाल लागतो. न्याय व्यवस्थेच्या या प्रकारामुळे गाव विकासात मोठ्या प्रमाणात अडथळे निर्माण होताना दिसुन येत आहेत. ही बाब महाराष्ट्राचे तत्कालीन गृहमंत्री आर.आर. पाटील यांच्या लक्षात आली आणि त्यांनी गावपातळीवरील वाद विवादाचे प्रकरण गावातच सामोपचाराने मिटविले जावे हा महत्त्वपूर्ण विचार मांडला आणि दि. १९ जुलै २००७ रोजी महात्मा गांधी तंटामुक्त अभियान या नावाने एक योजना महाराष्ट्रात लागू केली. दि. १५ ऑगस्ट २००७ पासून या योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी केली. या योजनेअंतर्गत गावपातळीवर महात्मा गांधी तंटामुक्त समितीची दरवर्षी १५ ऑगस्ट रोजी गावातील ग्रामसभेच्या बैठकीत सर्वानुमते निवड केली जाते ही समिती वर्षभर गावातील वाद विवाद गावातच सामोपचाराने मिटवते. गावातील एकही तंटा गावाबाहेर जाणार नाही किंवा गावातच मिटविला जावा हा या योजनेचा मुख्य हेतु असून अशा तंटामुक्त गावाला पुन्हा शासनाकडून काही ठरावीक रोख रक्कमेच्या स्वरुपात पुरस्कार दिला जातो.

आज महात्मा गांधी तंटामुक्त गाव अभियानामुळे गावातील वाद-विवाद गावातच सामंजस्याने मिटविले जात आहेत. परिणामी गावातील एकोपा, सलोखा, आपलेपणा टिकवून ठेवण्यात या योजनेची बरीच मदत होताना दिसुन येत आहे.

२. विषय निवड :-

कोणत्याही संशोधनासाठी संशोधन विषयाची निवड करणे गरजेचे असते. संशोधक या नात्याने संशोधनाच्या संदर्भात अनेक विषयाच्या संदर्भात विचार केला, कांही ज्येष्ठ संशोधक व मार्गदर्शकासोबत चर्चाही केली. त्यातच मी ग्रामीण भागाचे प्रतिनिधीत्व करत असल्यामुळे गावातील सर्वच परिस्थिती जाणुन आहे. गावपातळीवरील वाद विवाद सोडविण्यासाठी महात्मा गांधी तंटामुक्त समितीचे कार्यही मी जवळुन पाहिले आहे. ही समिती आज गावपातळीवर अतिशय प्रभावीपणे कार्य करत आहे. गावाचा एकोपा टिकवून ठेवण्यात या समितीची भुमीका महत्त्वपूर्ण राहिलेली आहे. शासनाने जो हेतु समोर ठेवुन या योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी केली तो हेतु खरच सफल होत आहे किंवा नाही हे संशोधक आणि देशाचा सुजाण नागरिक या नात्याने पाहणे आणि त्याचे मुल्यमापन करणे हे माझे परम कर्तव्य असुन त्या कर्तव्यापोटी आणि माझ्या पदवीसाठी मी "महात्मा गांधी तंटामुक्त समितीची ग्रामविकासातील भुमिका व योगदान : एक समाजशास्त्रीय अध्ययन (विशेष संदर्भ : लातूर जिल्हा)" या विषयाची निवड केलेली आहे.

३. संशोधनाची गृहीतकृत्ये :-

सामाजिक शास्त्रातील संशोधनासाठी वैज्ञानिक पद्धतीचा अवलंब केल्याशिवाय संशोधन कार्यात शास्त्रीय ज्ञानाची निर्मिती करता येत नाही. यासाठी संशोधकाला संशोधन आराखड्याची जाणीव असावी लागते. एखादा अभ्यास विषय निश्चित केल्यानंतर त्या विषयाबाबत कांही कल्पना, उपकल्पना मनात गृहीत धराव्या लागतात. निवडलेल्या विषयातील समस्यांचे निराकरण करण्यासाठी कांही संभाव्य उत्तरे व अंदाज बांधावे लागतात. त्यामुळे संशोधकाला आपल्या संशोधनाची दिशा आणि गती ठरविता येते. गृहीतकृत्यावरच संशोधनाच्या निष्कर्षाचे स्वरुप बरेच अवलंबून असते. परंतु गृहीतकृत्यानुसार निष्कर्ष काढणे याला संशोधन म्हणता येत नाही. गृहीतकृत्ये हे संशोधकाला संशोधन कार्यात मार्गदर्शक ठरतात व दिपस्तंभाप्रमाणे दिशा दाखवतात, म्हणजेच संशोधकाला त्यांच्या ध्येयपुर्तीपर्यंत पोहचण्यास मदत करतात. सर्वसामान्यपणे

गृहीतकृत्ये आपल्या संशोधनाच्या विषयाशी मिळते जुळते असावे लागतात. परिणामी संशोधन कार्यातील अडथळे आपोआप दुर होतात. मी संशोधक या नात्याने माझ्या अभ्यासविषयाशी सुसंगत असे गृहीतकृत्ये मांडलेली आहेत. ती पुढीलप्रमाणे -

१) न्याय निवाडा करत असताना समितीमार्फत पक्षपात केला जातो.

२) तंटामुक्त समितीमुळे गावातील वादविवादाचे प्रमाण कमी झाले आहे.

३) तंटामुक्त समितीमुळे गाव विकासाला चालना मिळत आहे.

४) तंटामुक्त समितीमुळे गावातील सलोखा टिकवुन ठेवण्यास मदत होत आहे.

५) तंटामुक्त समितीत महिला सदस्यांचे प्रमाण अल्प आहे.

६) तंटामुक्त समितीमार्फत वाद-विवाद सोडवित असताना कायद्याचा आधार घेतला जात नाही.

४. संशोधनाचा उद्देश :-

"महात्मा गांधी तंटामुक्त समितीची ग्रामविकासातील भुमिका व योगदान : एक समाजशास्त्रीय अध्ययन (विशेष संदर्भ : लातूर जिल्हा) या विषयाची निवड करताना मनात काही महत्त्वपूर्ण उद्देश गृहीत धरले असुन या उद्देशाशिवाय संशोधनाची दिशा आणि मार्ग निश्चित होणार नाही.

१) महात्मा गांधी तंटामुक्त समितीतील सदस्यांचा गावविकासासंदर्भातील दृष्टीकोण कसा आहे? हे अभ्यासणे.

२) महात्मा गांधी तंटामुक्त समितीतील सदस्य आपली कौटुंबिक जबाबदारी सांभाळून गावाच्या सामाजिक परिवर्तनासंदर्भात कितपत योगदान देतात. त्यांच्या कार्यामुळे परिवर्तन होईल काय? या विषयीची सखोल माहिती मिळविणे.

३) प्रत्यक्ष वाद विवाद सोडविताना येणा-या अडचणीचा कशा प्रकारे सामना करतात याचा शोध घेणे.

४) निर्णय प्रक्रियेत कायदेशीर बाजु तपासल्या जातात काय? याचा शोध घेणे.

५) महिला सदस्यांचा निर्णय प्रक्रियेतील सहभाग जाणून घेणे.

६) निर्णय प्रक्रिया निपक्षपातीपणे होते किंवा नाही याचा शोध घेणे.

५. तथ्य संकलन :-

कोणत्याही शास्त्रातील संशोधनासाठी तथ्य संकलन ही बाब अनिवार्य असते. विषय निवडीपासून ते मुल्यमापन या संशोधन पद्धतीच्या मदतीने संशोधन करताना शास्त्रीय माहिती साह्यभूत ठरत असते. या शास्त्रीय माहितीचा संशोधक प्रत्यक्ष लिखाण करत असताना शिदोरी म्हणून वापर करीत असतो. मात्र तथ्य संकलन करताना संशोधकाने संबंधीतपणा, तटस्थता, तार्कीकता आणि वस्तुनिष्ठता यासारख्या तत्त्वांचा वापर केला पाहिजे. 'तथ्यसंकलन म्हणजे, अनुभवसिद्ध सत्यापणीय अवलोकन होय.'

तथ्य संकलनाचे प्राथमिक स्त्रोत व दुय्यम स्त्रोत असे दोन प्रकार पडतात.

प्राथमिक स्त्रोत :- प्राथमिक स्त्रोतात प्रश्नावली, मुलाखत, निरिक्षण व अनुसुची असे चार प्रकार आहेत. विषयाचे स्वरुप लक्षात गेवून तथ्य संकलनासाठी अनुसूची ह्या तंत्राचा अवलंब करुन तथ्य संकलन केले जाईल.

दुय्यम स्त्रोत :- दुय्यम स्त्रोत हा ख-या अर्थाने संशोधनाचा पाया असतो. विषयाची ओळख व विषय निवड, विषयासंबंधीच्या विविध संकल्पनांची ओळख ही दुय्यम स्त्रोताचा आधार घेतल्याशिवाय होत नाही म्हणून माझ्या प्रस्तुत संशोधनात दुय्यम स्त्रोताचाही वापर केला जाईल.

६. नमुना निवड व अध्ययन क्षेत्र :-

संशोधनासाठी निवडलेला विषय सर्वसमावेशक आणि त्याची व्याप्ती जर अमर्याद असेल तर एका संशोधकाला सर्वच घटकांचा अभ्यास करणे शक्य नसते. एका संशोधकाची कार्यक्षमता ही मर्यादीत असते, विविध घटकांची कारणमिमांसा करण्यावर मर्यादा पडतात. संशोधन जर दिर्घकाळ चालले तर त्याचे महत्त्व कमी होऊ शकते. वेळ निघून गेल्यास एखाद्या गोष्टीचे महत्त्व राहत नाही. नमुना निवड ही संशोधनातील एक महत्त्वाची बाब आहे. त्यामुळे संशोधकाला सुक्ष्म दृष्टीकोनातून अभ्यास करता येतो.

नमुना निवडीत समग्रातून निवडलेल्या कांही एककांचा म्हणजेच नमुन्याच्या पाहणीवरून समष्टीबाबत सामान्य स्वरुपांचे निष्कर्ष काढता येतात म्हणून संशोधकाला नमुना निवड या तंत्राचा संशोधनात वापर करावा लागतो. 'नमुना म्हणजे, समग्राचा एक छोटासा प्रतिनिधी होय.'

मी संशोधक या नात्याने तथ्य संकलन करण्यासाठी महाराष्ट्रातील एक सर्वसमावेशक जिल्हा म्हणून लातूर जिल्ह्याची निवड केलेली आहे. लातूर जिल्ह्यात लातूर, निलंगा, उदगीर, अहमदपूर, औसा, रेणापूर, चाकूर, देवणी, जळकोट व शिरुर अनंतपाळ असे दहा तालुके आहेत. या सर्व तालुक्यांना समान न्याय देण्याच्या दृष्टीकोनातून प्रत्येक तालुक्यातून वीस (२०) या प्रमाणात एकूण १० तालुक्यातून २०० नमुन्याची प्रत्यक्ष अध्ययनासाठी निवड केली जाईल. ही निवड १५ ऑगस्ट २०१६ ते १५ ऑगस्ट २०१८ या दोन वर्षाच्या कालावधीत अस्तित्वात असणा-या महात्मा गांधी तंटामुक्त गाव समितीतील पदाधिकारी व सदस्यांची असेल.

नमुना निवडीसाठी गैरसंभाव्यता नमुना निवड प्रकारातील सहेतुक नमुना निवड प्रकाराचा अवलंब करुन प्रत्यक्ष अध्ययनासाठी २०० नमुन्यांची निवड केली जाईल.

७. संशोधन प्रक्रिया : सांकेतीकरण, वर्गीकरण व सारणीकरण :-

वरील निर्देशित सांकेतीकरण, वर्गीकरण व सारणीकरण या बाबी संशोधनात अतिशय महत्त्वाची भूमिका बजावित असतात. यामुळेच संशोधन प्रक्रिया सुलभ होते. संशोधनासाठी जे तथ्य संकलन केलेले असते ते विस्कळीत आणि अव्याप्त स्वरुपाचे असते, ते जशास तसे वापरता येत नाही म्हणून ब-याच मोठ्या स्वरूपाच्या बाबी थोडक्यात, अचुकपणे व कमी वेळात मांडण्याचा उत्तम मार्ग ठरतात. अभ्यास विषयाचा आशय न बदलता, संशोधनाच्या सर्व बाबी सुरक्षीत ठेवुन संशोधन आराखड्याच्या चौकटीत या वरील बाबी कार्य करीत असतात. विशेष म्हणजे या तिन्ही बाबी परस्परपुरक व परस्परावलंबी स्वरुपाच्या आहेत. या जणु कांही संशोधकाला मदतच करीत असतात म्हणून त्यांचा संशोधनात वापर केला जाईल.

८. संशोधनाची उपयुक्तता :-

१) महात्मा गांधी तंटामुक्त समितीतील सदस्यांची गावविकासातील भुमिका समजून घेता येते.

२) गावविकाससंदर्भातील तंटामुक्त सदस्यांची भूमिका इतरांसाठी मार्गदर्शक ठरू शकेल.

३) गावातील सलोखा वाढविण्यास साह्यभूत ठरेल.

४) गावपातळीवरील वादविवादाचे प्रमाण कमी होण्यास मदत होईल.

५) गावातील वाद गावातच मिटविले जातील.

६) पोलीस व न्याय व्यवस्थेवरील भार कमी होण्यास साह्यभूत ठरेल.

९. प्रकरणांचा तपशील :-

१) ऐतिहासिक पार्श्वभूमी

२) संशोधन आराखडा

३) महात्मा गांधी तंटामुक्त समितीची भुमिका व योगदान

४) महात्मा गांधी तंटामुक्त समितीला येणा-या अडचणी व उपाययोजना

५) निष्कर्ष व शिफारशी

१०. संदर्भग्रंथ सूची :-

१) गांधी एक अध्ययन : रमेश सक्सेना, विश्वभारती पब्लिकेशन, दिल्ली.

२) समाजशास्त्रीय संशोधन : तत्वे व पद्धती, प्रा. रा.ना. घाटोळे, मंगेश प्रकाशन, नागपूर.

३) सामाजीक संशोधन पद्धती : डॉ. हनुमंत मिसाळ, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद.

४) माझे गाव व माझे तिर्थ : अण्णा हजारे, राळेगणसिद्धी परिवार प्रकाशन, राळेगणसिद्धी.

५) ग्रामीण नागरी समाजशास्त्र : डॉ. बी.एम. कराडे, पिंपळापुरे ॲण्ड कंपनी पब्लीकेशन, नागपूर.

६) संशोधन पद्धती शास्त्र व तंत्र : डॉ. प्रदीप आगलावे, नागपूर.

संशोधक
प्रा. ज्योती ज्ञानोबा मुंडे
समाजशास्त्र विभाग,
मास्टर दीनानाथ मंगेशकर महाविद्यालय,
औराद (शहा.), ता. निलंगा, जि. लातूर

मार्गदर्शक
प्रा. डॉ. अंजली जोशी (टेंभुर्णीकर)
समाजशास्त्र विभाग,
दयानंद महाविद्यालय, लातूर